ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक प्रशिक्षणातील आव्हाने व उपाय

**प्रा. ज्योत्स्ना मोहन कांबळे**
*टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

शिक्षकांचे प्रशिक्षण ही एक शिक्षण व्यवस्थेतील सर्व शिक्षण प्रक्रियेची मातृतुल्य संस्था आहे. आजच्या घडीला शिक्षण प्रशिक्षण विभागीय, राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय पातळीवरील या प्रशिक्षणाच्या व्यवस्थेत विविध आव्हाने निर्माण झाली आहेत. विविध अडथळयांच्या शर्यतीतून शिक्षक प्रशिक्षण मार्गक्रमण करत आहे. शिक्षकांचे शिक्षण समग्र होण्यासाठी अनेक विचार प्रणालींचा, शिक्षणाशी संबंधित असलेल्या संस्थांचा, नवीन शैक्षणिक उपक्रमांचा विचार करावा लागतो. त्याचे कारण असे की नवशिक्षणाच्या मुख्य उद्दिष्टाचे लक्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होय. तो साध्य करायचा असेल तर केवळ शिक्षकांचे अध्यापन कौशल्य विकसित करून भागणार नाही तर शिक्षकांच्या संपन्न व्यक्तिमत्वावर भर द्यावयास पाहिजे. अध्यापन कला ही उपजत असते की, ती प्रयत्नपूर्वक साध्य करावी लागते याचाही विचार करणे आवश्यक असते. जसेच एकदा शिक्षकाचे प्रशिक्षण पूर्ण झाले की त्याच्या शिक्षणाचा पूर्ण विराम झाला असे समजावयाचे की, ते शिक्षण पुढे चालू ठेवावयाचे हया प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आले तर ते कसे चालू ठेवावयाचे हयाही प्रश्नाचा विचार करावा लागेल. हया सर्व गोष्टीमुळेच शिक्षण प्रशिक्षण हे प्रभावी व परिणामकारक कसे देता येईल ते देण्यासाठी कोणकोणत्या कार्यनिती राबवाव्या लागतील याचा विचार आपल्याला शिक्षक प्रशिक्षणात करावयाचा आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आराखडयानुसार व NCTE Regulation act च्या चौकटीत राहून शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम हा एक वर्षावरून दोन वर्षासाठी तयार केला गेला आहे. सद्यस्थितीत व भविष्यातही विविध समस्या, आव्हाने मर्यादा शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये निर्माण होताना दिसत आहे. भारताच्या एकण लोकसंख्येच्या तुलनेत प्रशिक्षित शिक्षकांची लागणारी गरज सद्यस्थितीत पूर्ण आहे असे वाटते मात्र वस्तुस्थिती पाहता अनेक प्रशिक्षित यिाक्षकांची आवश्यकता आपल्या व्यवस्थेला भासणार आहे. म्हणूनच एकाबाजूला शिक्षक प्रशिक्षणाच्या माध्यामातून समाजाच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करायचा तर दुस-या बाजूला विविध नियमांची पूर्तता व त्याची अंमलबजावणी करताना विविध समस्यांना तोंड दयायचे अशी दुहेरी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**आव्हाने**

१. **शिक्षक प्रशिक्षणाचे ध्येय साध्य करणे** – ही ध्येय संस्थेच्या व शासनाच्या धोरणावर अवलंबून असतात. शासनाची खाजगीकरणा विषयीची जी धोरणे आहेत त्याने सुद्धा मुख्य ध्येयपूर्ती होण्यासाठी विविध अडथळे निर्माण होत आहेत. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण याचा उद्दिष्ट पूर्ण करण्याकरता प्रतिकूल परिणाम होतो

२. **शिक्षण प्रशिक्षणपूर्तीसाठी असणारा अभ्यासक्रम** – शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी NCTE अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करुन देते. जेव्हा अभ्यासक्रमात बदल होतो त्यात नवा व जुना अभ्यासक्रम यामध्ये फारसा फरक दिसून येत नाही. यामध्ये एकूण पेपरची संख्या वाढते अथवा कमी होते. या सर्व प्रक्रियेतून प्रशिक्षण घेणा–या विद्यार्थ्याला ज्ञानात्मक आशय उत्तम त–हेने मिळतोच असे नाही, फक्त ज्ञानशाखेचे कप्पे एकापेक्षा अधिक होतात.

३. **शिक्षक प्रशिक्षणामधील अध्यापनाच्या विविध पद्धती** – सर्वसामान्यपणे शिक्षक प्रशिक्षणात व्याख्यान, दिग्दर्शन, समस्या निराकरण आदी पद्धतींचा वापर केला जातो. बदलत्या काळानुसार शिक्षक प्रशिक्षणातील सर्व अध्यापन पद्धती, तंत्र व तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे.

४. **शिक्षक प्रशिक्षणासाठी आवश्यक मनुष्यबळाची निवड** – NCTE Regulation नुसार आवश्यक मनुष्यबळाची निवड करणे कठीण झाले आहे. कला शिक्षक, शारीरिक शिक्षण शिक्षक, योग शिक्षक व विद्यार्थीसंख्येनुसार शिक्षक यांचा ताळमेळ बसणे कठीण झाले आहे देशातील शिक्षक प्रशिक्षणाच्या व्यवस्थेत सर्व देशपातळीवर राज्याराज्यात सारखी परिस्थिती दिसून येत नाही.

५. **नॅक या संस्थेकडून केले जाणारे मूल्यांकन** – विना अनूदानित तत्वावर चालत असलेल्या संस्था नॅककडून सहजासहजी मूल्यांकन करून घ्यायला तयार होत नाही. स्वबळावर चालवल्या जाणा–या संस्था शासनाचे नियम, धोरणे मान्य करायला तयार नसतात.

६. **शिक्षक प्रशिक्षणामधील अस्थिरता** – प्रशिक्षण पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यास सेवा सुविधांचा लाभ तात्काळ मिळू शकत नाही. सेवा संधी मिळाली तरी कमी वेतनामध्ये भरपूर काम करावे लागते. त्यामुळे या क्षेत्रात चांगली माणसे टिकून रहात नाही. त्यामुळे शिक्षकांना विविध मानसिक, शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते.

७. **सराव पाठांच्या शाळांची कमतरता** – शिक्षक प्रशिक्षणात सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे विविध प्रकारचे पाठ. एकूण पाठ संख्या, छात्रसेवाकाळातील पाठाशिवाय विविध उपक्रमातील सहभाग इ. गोष्टींचा विद्यार्थी शिक्षकास प्रत्यक्ष मिळणारा अनुभव शाळांच्या निकोप सहकार्यावरच अवलंबून असतो. परंतू शाळात मिळणारा अनुभव असहकार्यामुळे पूर्ण होत नाही.

८. **विद्यार्थी प्रवेश** – शिक्षक प्रशिक्षण कालावधी दोन वर्षाचा झाल्यामुळे या क्षेत्राकडे विद्यार्थ्याचा कल कमी होण्याचीच शक्यता आहे. वेळ,श्रम आणि अर्थ यांचा विचार हल्लीचे विद्यार्थी करू लागले आहेत. प्रवेश प्रक्रियेतील अनियमितता याने देखील प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेश घेण्याचे टाळू लागला आहे.

९. **अर्थसहाय्य उपलब्ध नाही** – शिक्षक प्रशिक्षण संस्था चालविणा–या व्यक्ती स्वबळावर मिळण–या फी द्वारे सर्व खर्चाची पुर्तता करत असतात. परंतू एकूण विषयांची संख्या, राबविण्यात येणारे सर्व उपक्रम, कर्मचा–यांचा पगार या सर्वांचा मेळ

घालणे अतिशय अवघड होवून बसले आहे .शासनाकडून कोणत्याही प्रकारची अर्थसहाय्य स्वबळावर चालणा–या संस्थांना मिळत नाही.

**१०. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर** – नवनवीन तंत्रज्ञानाचा अध्यापनात कुशलतेने वापर करता आला पाहिजे. तंत्रज्ञानात झालेले बदल त्वरित स्विकारणे गरजेचे आहे.

**११. शिक्षक प्रशिक्षणाची संख्यात्मक वाढ** – संख्यात्मक वाढ झाली पण त्याचा परिणाम शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्तेवर होताना दिसून येत आहे. हेच विद्यार्थी विविध विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्यरत होतात त्यामुळे त्याचा परिणाम पुर्ण शैक्षणिक स्तरावर होऊ शकतो.

**१२. कौशल्यपूर्ण शिक्षण व औद्योगिकता** – बेरोजगारी कमी होण्यासाठी कौशल्यपूर्ण शिक्षण व औद्योगिकता यांची सांगड घालणे आवश्यक आहे. समाज्याच्या गरजा लक्षात घेवून त्यानुसार प्रशिक्षणाची व्यवस्था करावी लागेल.

**१३.अभिनव पद्धती** – नवनवीन पद्धतीचा शोध व त्याचा अध्यापनात व शिक्षक प्रशिक्षणात कुशलतेने वापर केला पाहिजे. अध्यापनात नाविण्यता आणणा–या शिक्षकाचे कौतुक केले पाहिजे.

**उपाय योजना**

१. नियमित व वेळेत प्रवेश प्रक्रिया
२. अभ्यासक्रम रचनेत बदल
३. उद्दिष्टानुसार कार्यवाही
४. नॅकबाबत सकारात्मक दृष्टिकोणाचा विकास
५. सराव पाठाबाबत शासनाकडून योग्य उपाय योजना
६. शिक्षकांना सेवा संधी व्यवस्थेत स्थैर्य प्राप्ती
७. उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांचा वापर
८. प्रशिक्षित शिक्षकांच्या नेमणूका
९. शिक्षकांसाठी प्रोत्साहनात्मक उपक्रम
१०. गुणवत्ता विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन

**संदर्भ**

*पारसनीस, (२००८), शिक्षकांचे प्रशिक्षण, नित्य नूतन प्रकाशन, पुणे*
*साळुंके, पाईकराव, (२००८),शिक्षण आणि अध्यापक शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण प्रकाशन, नाशिक*
*जाधव, (२००५),नवीन काळाचे शिक्षण, नाशिक*
*नानकर, शिरोडे, (२००६), वर्तमान शिक्षणातील विचार प्रवाह, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.*